1453
जा. क्र प्रानासंकेंद्र/आस्था/ /२०१८
प्रादेशिक नारळ संशोधन केंद्र, भाटये
दिनांक :– 2 3 OCT 2018

# निविदा सूचना

**विषय** :– प्रादेशिक नारळ संशोधन केंद्र, भाटये, ता. जि. रत्नागिरी या कार्यालयामध्ये कंत्राटी पध्दतीने एकत्रित वेतनावर पदे भरणे बाबत...

**संदर्भ** : विद्यापीठ पत्र क्र. जा.क्र.डॉ.बासाकोकृवि/संशो–३/८२७/२०१८, दि. २३. १०. १८.

उपरोक्त संदर्भाधीन विषयान्वये या कार्यालयाला खालील नमुद पदे कंत्राटी पध्दतीने एकत्रित वेतनावर दि. १३/११/२०१८ ते दि. ३१/०३/२०१९ या कालावधीत भरण्यासाठी मोहोरबंद दरपत्रके मागविण्यांत येत आहेत. कंत्राटी एकत्रित वेतनावरील पदाचे नांव, कामाचे स्वरूप/तपशिल आणि शैक्षणिक अर्हतेचा तपशिल पुढील प्रमाणे.

| अ. क्र. | पदाचे नांव | कामाचे स्वरूप / तपशिल | शैक्षणिक अर्हता | पदाची संख्या |
|---|---|---|---|---|
| ०१) | कार्यालय सहाय्यक | मा. कृषिविद्यावेत्ता, संशोधन अधिकारी, कनिष्ठ किटकशास्त्रज्ञ यांच्या प्रायोगिक कामाचे मासिक/वार्षिक अहवाल संगणकावर तयार करणे, मा. कृषिविद्यावेत्ता यांना प्रयोगाची निरीक्षणे नोंदणीस मदत करणे व संगणकावर नोंदी घेणे तसेच मा. प्रकल्प समन्वयक तसेच विद्यापीठातील दैनंदिन मराठी व इंग्रजी पत्रव्यवहार तयार करण्यास मदत करणे इमेलद्वारे पाठविणे तसेच आलेले इमेल वरिष्ठांच्या निदर्शनास आणणे. कार्यालयातील सर्व खरेदी संबंधी प्रस्ताव तयार करणे. कार्यालयाचे सर्व टंकलेखनाची कामे करणे, तसेच कार्यालयातील इतर दैनंदिन कामे करणे, वरिष्ठ लिपिक यांना लेखा परीक्षण, आक्षेप, अंदाजपत्रक इ. कामामध्ये मदत करणेसाठी व या सर्व बाबी योग्यरित्या सुसूत्रितपणे चालविण्यासाठी सदर पदाची आवश्यकता आहे. | कोणत्याही शाखेची पदवी, MSCIT , टायपींग मराठी ३० व इंग्रजी ४० श.प्र.मी., संगणकातील MS World, Excel, Power Point Presentation, Photoshop मध्ये काम करता येणे आवश्यक, तसेच विद्यापीठाच्या संशोधन केंद्रावर किमान ८ वर्षाचा कार्यालयीन कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य | १ |
| ०२) | कृषि सहाय्यक | मजुरांचे रेकॉर्ड, दैनंदिन कामाची वाटणी करण्यास मदत करणे, मजुरांचे नियमित डेली लेबर शिट व प्रोगॅम रजिस्टर पूर्ण करणे. प्रक्षेत्रावरील मजुरांकडून दिलेली कामे वेळोवेळी नियमीत पूर्ण करून घेणे. ठेक्यावरील मजुरांच्या निवीदेनुसार फाईल तयार करणे, प्रक्षेत्रावरील वापरलेल्या वस्तूंचे नियमित रिक्वीशनच्या नोंदी घेणे या कामी मदत करणे. शाळा, महाविद्यालयीन विद्यार्थी व शेतकरी यांना वरिष्ठांच्या सुचनेनुसार प्रक्षेत्रासंबंधी माहिती देणे. तसेच जैविक किड नियंत्रण प्रयोगशाळेत ब्रॅकॉन व गोनिओझस यांच्या निर्मितीच्या सदर रजिस्टरमध्ये नोंद घेणे. इ. कामे करणे आवश्यक आहे. या सर्व बाबी योग्यरित्या सुसूत्रपणे चालविण्यासाठी सदर पदाची आवश्यकता आहे. | कृषि विद्यापीठ मान्यता प्राप्त कृषि विद्यालयातून कृषि पदविका अभ्यासक्रम पूर्ण MSCIT कोर्स उत्तीर्ण, टायपींग इंग्रजी ३० श. प्र.मी., तसेच विद्यापीठाच्या संशोधन केंद्रावर किमान ६ वर्षाचा प्रक्षेत्रावरील कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य | १ |

१३. आदेश मिळाल्यापासून सात दिवसाच्या आंत त्यांना नेमणूकीच्या ठिकाणी प्रत्यक्ष कर्तव्यावर हजर व्हावे लागेल अन्यथा सदर नेमणुकीचे आदेश रद्द करण्यांत येतील.

१४.सदर तात्पुरती नेमणूक उमेदवाराचे पूर्व चारित्र्य व वर्तणुक तसेच नेमुन दिलेले काम यांच्या समाधानकारक तपासणी अहवालावर अवलंबून राहिल. असा अहवाल आक्षेपाई असल्यास कोणतीही पूर्व सुचना न देता उमेदवारास पदावरून कमी करण्यांत येईल.

१५.उमेदवाराला देण्यात आलेले काम सोडावयाचे असल्यास त्याने तशी आगाऊ सूचना देऊन राजिनामा मंजूर करून घ्यावा. जर तशी आगाऊ सूचना न दिल्यास संबंधितांकडून १ महिन्याचा मेहनताना वसुल करण्यांत येईल. तसेच अशा व्यक्तीचा ठेका भविष्यात विचारात घेता येणार नाही.

१६. कोणतेही कारण न दाखविता सेवा समाप्त करण्याचे पूर्ण अधिकार कार्यालयाला असतील.

१७. निवड झालेल्या उमेदवाराल दरपत्रक तसेच तात्पुरत्या स्वरूपातील नेमणूकीच्या आदेशामधील अटी व शर्ती मान्य असल्या बाबतचे हमीपत्र रक्कम रू. १००/— मात्रच्या बंधपत्रावर लिहूण देणे बंधनकाराक आहे.

**कृषिविद्यावेत्ता,**
**प्रादेशिक नारळ संशोधन केंद्र,**
**भाटये, ता.जि. रत्नागिरी.**

प्रत: प्रसिद्धीसाठी रवाना

१) मा. संचालक विस्तार शिक्षण, डॉ.बा.सा.को.कृ.वि.,दापोली यांना विनंती करण्यात येते की वरील निविदा विद्यापीठाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करून मिळावी.

२) मा. प्रमुख कृषि ज्ञान माहिती केंद्र, akmudbkkv@gmail.com सकेंत स्थळावर प्रसिध्द करण्यासाठी

३) प्रा.ना.सं.केद्र, भाटये (कार्यालय नोटीस बोर्ड)

वर तपशिलात नमूद केल्याप्रमाणे कंत्राटी पध्दतीने एकत्रित प्रतिमहा वेतनाचा दर नमुद करून सदरचे दरपत्रक दिनांक १२/११/२०१८ रोजी सायंकाळी १६.०० वाजेपर्यंत पोहोचतील या बेताने या कार्यालयात पोस्टाने किंवा हातबटवडा द्वारे स्विकारल्या जातील.



कामाच्या अधिक माहितीसाठी आणि अटीसंबंधी कार्यालयात कामाचे दिवशी कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

***अटी व शर्ती :—***

१. कार्यालयाच्या कामकाजाची वेळ सकाळी ७.४५ ते दुपारी १२.०० वा. आणि दुपारी १.४५ ते सायंकाळी ५.१५ वाजता अशी असेल. तथापि एखादया दिवसाचे काम वाढल्यास काम पूर्ण होई पर्यंत थांबावे लागेल किंवा कामपूर्ण करण्यासाठी लवकर यावे लागेल.

२. साप्ताहिक व इतर सार्वजनिक सुटया अनुज्ञेय राहतील.

३. जादा केलेल्या कामाचा अलाहिदा, मोबदला मिळणार नाही.

४. गैरहजर/ अनुपस्थित कालावधीचा मेहनताना कपात करण्यात येईल. गैरहजर राहणार याची आगाऊ सूचना देणे बंधनकारक आहे. साप्ताहिक व इतर सार्वजनिक सुटया अनुज्ञेय राहतील.

५. दरपत्रक कृषिविद्यावेत्ता, प्रादेशिक नारळ संशोधन केंद्र, भाटये, ता.जि. रत्नागिरी यांचे नावे असणे आवश्यक आहे. **तसेच त्यावर ''एकत्रित वेतनावर कंत्राटी पद्धतीने पदे भरणे बाबत'' असे लिहीणे आवश्यक आहे.**

**६. संबंधित कामाचा अनुभव व कुशलता असणे आवश्यक त्यांना प्रथम प्राधान्य दिले जाईल.**

७. दरपत्रकासोबत सर्व आवश्यक शैक्षणिक कागदपत्रांच्या छायांकीत प्रती जोडणे आवश्यक आहे. तसेच दरपत्रकामध्ये एका कामगाराचे **प्रति महिन्याचे एकत्रित वेतनाचा दर नमुद करणे आवश्यक आहे.**

८. सदरचा तात्पुरता कंत्राटी पद्धतीची नेमणूक ही कामाचा उरक, अचूकता इत्यादी बाबी समाधानकारक तपासणी अहवालावर अवलंबून राहील असा अहवाल आक्षेपार्ह असल्यास कोणतीही पूर्व सूचना न देता सदर ठेका रद्द करण्यांत येईल.

९. वरील कंत्राटी सेवा करण्या—या उमेदवाराला डॉ. बा. सा. कोकण कृषि विद्यापीठ, दापोली अंतर्गत कायम स्वरूपी नोकरी मिळण्यासाठी या कंत्राटाच्या सेवेचा हक्क प्राप्त होणार नाही. कंत्राटी पद्धतीने नेमलेल्या मनुष्यबळांची सेवा जेष्ठता नोंदी ठेवण्यात येणार नसून त्यांच्या कायम सेवेबाबतची कोणतीही बांधिलकी विद्यापीठ प्रशासनावर अथवा शासनावर राहणार नाही. तसेच सर्वोच्च न्यायालयाने निर्धारित केलेल्या याचिका क्र. एसएलपी—५४५३/९० निर्णयाच्या अनुषंगाने या ठेका कालावधीनंतर विद्यापीठ सेवेत कायम स्वरूपी नोकरी मिळणेबाबत हक्क राहणार नाही.

१०. कोणतेही प्राप्त दरपत्रक स्विकारणे अथवा नाकारणे बाबतचे त्याचप्रमाणे कोणतेही कारण न देता सदरील प्रक्रिया रद्द करणे बाबतचे अधिकार निम्नस्वाक्षरीकारांनी राखून ठेवले आहेत.

११. दरपत्रके कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी व वेळेत टपालाद्वारे अथवा हात बटवडयाने प्राप्त होण्याची **अंतिम तारीख १२/११/२०१८** अशी असेल. **(दुपार ४ वाजेपर्यंत)**

१२. सदरची नेमणूक निव्वळ तात्पुरत्या दि. १३/११/२०१८ ते दि. ३१/०३/२०१९ कालावधीपर्यंत करण्यांत येणार आहे.